# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | २१ जून १९९२ | अंक ६ वा


# 'भारता'च्या मानगुटी नेहरूवादाचे भूत

**— शरद जोशी**

२३ मे रोजी जवाहरलाल नेहरू यांची पुण्यतिथी देशभर साजरी झाली. नेहरू-गांधी घराण्यातील एका मागोमाग एक तीन पंतप्रधान झाले. त्या तिघांपैकी प्रत्येकाची जयंती आणि पुण्यतिथी असे दोन दिवस पाळले जातात. त्या खेरीज मोतीलाल नेहरू आणि संजय गांधी यांच्या नावेही आकाशवाणी, दूरदर्शन यांवर एक कोणतातरी दिवस पाळला जातोच. म्हणजे, नेहरू-गांधी घराण्यातील व्यक्तींकरिता एकूण आठ दिवस पाळले जातात.

तीन पंतप्रधानांच्या जन्मदिनी आणि मृत्युदिनी यमुनाकाठच्या त्यांच्या शांति आणि शक्ती स्थलांवर सगळ्या अतिविशिष्ट व्यक्तींची रीघ लागते; राष्ट्रपतींपासून सुरुवात करून ते शेवटी वसंतराव साठ्यांसारख्या माजी मंत्र्यांपर्यंत. पुष्पमाला अर्पण करण्याचा हा कार्यक्रम सर्व बातमीपत्रांत दिवसभर दाखविला, ऐकविला जातो. नंतर कुठेतरी अगदी सात्त्विक स्वरूपाचा भजन इत्यादींचा कार्यक्रम होतो त्यालाही अतिविशिष्ट मंडळी मोठी आवर्जून उपस्थित राहातात. दिवसभर मोठ्या मोठ्या शहरांत पक्षांतर्फे सभा घेतल्या जातात. त्यांना थोडीफार निष्ठावान आणि पुष्कळशी आशाळभूत मंडळी हजर राहातात. आणि मग या नेत्यांच्या गुणवर्णनाला काही धरबंधच राहात नाही.

गेल्या २३ मे च्या कार्यक्रमात पंडित नेहरूंच्या स्मृतीवर अशाच स्तुतिसुमनांचा ढीग घालण्यात आला. भारताचा जवाहर, लोकांचे लाडके, स्वातंत्र्यलढ्यातील झुंजार नेते, देशाकरिता अमीरी फेकून देऊन वनवास हसत हसत पत्करणारे असे गुणवर्णन सर्वसामान्यपणे सहजच होते. पण, त्या पलिकडे, समाजवादी औद्योगीकरणाचे द्रष्टे, भारतीय निधार्मिकतेचे आधारस्तंभ, भारतीय लोकशाही परंपरांचे जनक आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील तटस्थ राष्ट्रांच्या चळवळीचे अध्वर्यू अशीही त्यांची भलावण मागील वर्षांपेक्षाही अधिक धूमधामीने करण्यात आली. जवाहरलाल नेहरूंशी प्रत्यक्ष परिचय असलेली काही मंडळी मग

'पंडितजींचे कैंचें बोलणें,
पंडितजींचें कैंचें चालणें,
पंडितजींची सलगी देणें,
कैंचें असें'

या सुरावर त्यांच्या शुभ्र वेषापासून मोहक हास्यापर्यंत आणि छातीवरील लाल गुलाबापासून गालावरील रक्तिम्यापर्यंत वर्णन करण्यात रंगून गेली होती.

जन्मतिथी, पुण्यतिथी असली म्हणजे त्या दिवसाच्या नायकाविषयी सत्य असो, कल्पित असो - चांगले बोलायचे असा शिष्टाचार आहे आणि तो सुसंस्कृतपणास धरूनही आहे. विशेषतः, मृताविषयी काही कोणाच्या मनाला लागेलसे बोलू नये, हे योग्यही आहे. पण तरीही, वास्तवाचे काही भान सुटले तर स्तुतीपर भाषणेसुद्धा हास्यास्पद वाटू लागतात कोणी उठून म्हणू लागले की पंडित नेहरू बारा फूट उंच होते आणि त्यांनी एकट्यांनी उत्तरेतील सरहद्दीवर जाऊन चिनी सैन्याचा पराभव केला तर ते गुणवर्णन नाही, कुचेष्टाच होईल. शिष्ठाचारालाही वास्तवाचे काहीसे कुंपण असलेच पाहिजे.

देशाच्या इतर थोर नेत्यांबाबत, स्वातंत्र्यसेनानींबाबत, अगदी महात्मा गांधीबद्दल बोलतांनासुद्धा वास्तवाचे कांही किमान भान ठेवले जाते. मौलाना आझादांविषयी बोलतांना अखेरच्या वर्षात त्यांच्या मनात जी कटुता

*नरसिंहराव सरकारचा पहिला वार्षिक वाढदिवस लौकरच साजरा होईल. हे सरकार सत्तेवर येताच मुक्त अर्थव्यवस्थेच्या तुताऱ्या जोरजोरात फुंकल्या गेल्या. शेतकऱ्यांच्या मनात आशा पालवल्या. पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून शेतकऱ्यांना निर्यात करून देशासाठी परकीय चलन मिळवून देण्याचे आवाहन केले आणि शेतकऱ्यांनी त्या आवाहनाला प्रतिसाद दिला. १० नोव्हेंबर १९९१ रोजी शेतकऱ्यांनी शेगाव येथे जमून चतुरंग शेतीच्या साहाय्याने भारताला आर्थिक संकटातून सोडविण्यासाठी 'भारत दशक' पाळण्याची घोषणा केली. 'इंडिया' च्या शासनाने शेतकऱ्यांच्या चतुरंग शेतीच्या कार्यक्रमाला पोषक धोरण स्वीकारले का? सरकार नेहरूवादी नियोजनाच्या पगड्यातून सुटले का?*

*शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी याविषयी केलेली ही परखड टिप्पणी.*

निर्माण झाली होती तिचा तिरकसतरी उल्लेख होतोच. सरदार वल्लभभाईंच्या तथाकथित जातीय दृष्टिकोनाविषयी अगदी उघड उघड लिहिले, बोलले जाते. ''देशाच्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र, गुलाम देशाला परराष्ट्रीय धोरण एवढेच असते.'' या भूमिकेतून स्वतःच्या आयुष्याची होळी करणाऱ्या सुभाषबाबूंवरसुद्धा त्यांना नेहरूंसारखी आंतरराष्ट्रीय दृष्टी नव्हती अशी टीकाटिप्पणी होतेच आणि महात्माजींवर तर त्यांच्या चरख्यापासून नौखालीतील ब्रह्मचर्याच्या प्रयोगांपर्यंत अनेक गोष्टींवरून हल्ले चढविले जातात.

आश्चर्याची गोष्ट अशी की आज सगळा नेहरूवाद कोसळून पडला आहे आणि तरीदेखील नेहरूंच्या शुभ्र अचकनीवर एक कुठे डाग पडलेला नाही.

नेहरूपद्धतीच्या नियोजनाने देशाचे दिवाळे वाजले आणि आजची आर्थिक दुरवस्था उभी ठाकली. नेहरूप्रणित इंग्रजी मुखवट्याची संसदीय लोकशाही कशीबशी लंगडत चालली आहे. देशातील वेगवेगळ्या धर्मा-जातींच्या अस्मितांना मान्यतेची तहान आहे तोपर्यंत युरोपियन तोडावळ्याची निर्धार्मिकता निरर्थक आहे. अयोध्या, काश्मिर, पंजाब, आसाम, मंडल आयोग यांप्रश्नी उफाळलेले उद्रेक हे स्पष्ट करतात. आणि समाजवादी रशियाचे साम्राज्यच सगळे कोसळून पडल्यामुळे समाजवाद या संकल्पनेलाच काही प्रतिष्ठा राहिली नाही; एवढेच नव्हे तर, आंतरराष्ट्रीय संघर्षातील एक पक्षच नाहीसा झाल्यामुळे तटस्थता या शब्दालाही काही अर्थ उरला नाही. नेहरूंनी ज्याला ज्याला हात लावला त्याची त्याची आज माती झालेली आहे अशी वास्तव परिस्थिती एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला जयंती असो वा पुण्यतिथी असो, इतर काही प्रयोजन असो नसो, नेहरूंचे सर्व क्षेत्रातील कर्तबगारीबद्दल गुणगान असा मोठा विचित्र व्यतिरेक दिसून येतो.

इतिहासाने ज्यांना सर्वस्वी खोटे पाडले अशांच्या नशिबी नेहरूंचे हे भाग्य सहसा येत नाही. जुनी गाडलेली प्रेते उकरूनसुद्धा त्यांच्यावर रागरोष व्यक्त केला जातो. गेल्या दोनतीन वर्षांतच पूर्व युरोपातील अनेक देशांत हे घडले. स्टॅलिनचे पुतळे केव्हाच उखडले गेले. लेनिनचे पुतळे आता खाली येत आहेत. त्यांची नावे दिलेली गावे, संस्था इत्यादींची नावे बदलून पुन्हा नवीन नावे दिली जात आहेत. पण भारतात असे काही घडतांना दिसत नाही. नेहरूंनी हात लावलेली प्रत्येक संकल्पना इतिहासाने भली खोटी पाडलेली असो, अजून कोठे नेहरूंचे पुतळे पाडल्याचे किंवा उतरविल्याचे ऐकिवात नाही. उलट, नव्या नव्या विमानतळांना, बंदरांना आणि प्रतिष्ठेच्या संस्थांना नेहरूंचे नाव नव्याने देण्याची पद्धत अजून चालूच आहे.

याचे एक कारण नेहरूंचे व्यक्तिगत भाग्य आणि त्यांच्या व्यक्तिमत्वातील राजबिंडेपणा हे आहे. सुवेज कालव्यावरील आक्रमण फसले आणि इंग्लंडचे पंतप्रधान अँथनी ईडन यांना चोवीस तासांत पंतप्रधान खाली करून चालते व्हावे लागले. ईशान्य सरहद्दीवर भारतीय सैन्याला मोठी अपमानास्पद शरणागती स्वीकारावी लागली. चीनसंबंधीचे सर्व धोरण पंडित नेहरूंनी व्यक्तिशः आखलेले होते; पण सरंक्षणमंत्री कृष्ण मेनन यांना जावे लागले, पंडित नेहरूंना त्याचा धक्का बसला नाही एवढेच नव्हे तर, उलट, लोकांची उदंड सहानुभूती मिळाली. मोठे भाग्य असल्याखेरीज हे शक्य नाही!

नेहरूंचा राजबिंडेपणाही त्यांचे स्थान अबाधित राहाण्याचे महत्त्वाचे कारण आहे. त्यांच्या हातून कितीही मोठ्या चुका घडल्या असोत, अनेक वेळा त्यांच्या मनाचा कोतेपणाही उघड झाला पण त्यांच्या चेहऱ्यावर कधी विक्राळ भाव आला नाही एवढेच नव्हे तर चेहऱ्यावरचे हसूही कधी मावळले नाही. भारतीयांची ही एक विशेषता आहे; कोणा राजबिंड्याने हंसत हंसत कितीही मोठी गफलत केली तरी लोकक्षोभ होत नाही. रौद्र मुद्रा असल्याखेरीज कोणाला ते खलपुरुष मानायला तयार होत नाहीत. भारतीय चौकटीत एखाद्या लोहियाला मान्यता मिळणे दुष्कर पण जवाहराची मान्यता अबाधितच राहाते.

स्वातंत्र्याच्या आंदोलनात दरिद्री अडाणी, शोषित-पिडित कोट्यावधी जनतेला इंग्रजांविरुद्ध उभे करण्यासाठी गांधीजींनी सत्य, अहिंसा इत्यादी धर्माधिष्ठित नैतिकतेचा वापर केला. या नैतिकतेच्या आधाराने लोक इंग्रजांविरुद्ध लढायला तयार झाले यात काही तथ्य आहे. पण इंग्रजांची भीती चेपण्याकरिता इंग्रजाइतका गोरा, त्याच्या सारखेच इंग्रजी बोलणारा जवाहरलाल अगदी तुरुंगातसुद्धा चहाचा डबा फेकून देतो आणि जेलरच्या घरून चहाचा ट्रे मागवतो या प्रतिमेचेही महत्त्वाचे स्थान होते.

चंपारण्यातील न्यायालयात जबाब देतांना गांधीजींनी एकदा म्हटले होते की, ''खेड्यापाड्यातील गरीब जनतेवर गोरे इंग्रज आणि एतद्देशीय शहरवासी जे अन्याय करताहेत त्याचा त्यांना ईश्वराच्या दरबारात एकदा जाब द्यावा लागेल.'' महात्माजींनी हे म्हटले खरे पण स्वातंत्र्याचे आंदोलन चालवतांना हे शहरवासी स्वातंत्र्याचा मंगलकलश पळवून नेणार नाहीत याची त्यांनी काही खबरदारी घेतली नाही. जवाहरलाल नेहरू हे स्वातंत्र्याच्या आंदोलनातील या एतद्देशीय 'इंग्रजां'चे प्रतिनिधी होते. त्यामुळे सुशिक्षित भद्र लोकांत त्यांची लोकप्रियता मोठी उदंड; इतकी की, देशाच्या, आर्थिक भवितव्यासंबंधी नेहरूंशी पराकोटीचे मतभेद असतांनाही महात्माजींना त्यांनाच आपले राजकीय वारस म्हणून जाहीर करणे भाग पडले.

स्वातंत्र्य अगदी उंबरठ्यावर आले असतांना महात्माजींनी स्पष्टपणे सांगीतले,

''जवाहरला आज पर्याय नाही, इंग्रजांकडून सत्तेचे हस्तांतरण होत असतांना तरी नाही. तो हॅरोत शिकला आहे. केंब्रिजचा पदवीधर आहे बॅरिस्टर आहे. इंग्रजांशी वाटाघाटी करायला त्याची गरज आहे.''

अशा राजबिंड्याच्या स्मृतीचा अवमान करण्याचे कोणाला काय कारण आहे? त्याचे पुतळे पाडण्याची काय आवश्यकता आहे? त्याच्या नावाची स्मारके उधळण्याची काय गरज आहे?

स्टॅलिन, लेनिनचे पुतळे खाली आले कारण स्टॅलिनवाद, लेनिनवाद खोटा पडला एवढेच नव्हे तर, त्या वादांच्या खोटेपणामुळे कित्येकांची आयुष्ये उजाड झाली आणि सर्वसामान्य माणसांना पावाच्या तुकड्यासाठी रात्ररात्र थंडीत कुडकुडत रांगेत उभे राहण्याची वेळ आली.

नेहरूप्रणित समाजवादी औद्योगीकरण फसले असेल पण त्याचे दुःख कोणाला? कारखानदारांना दुःख होण्याचे कारण नाही. उलट, पुन्हा थोडे शब्दांचे जंजाळ उभे करून उद्योगधंद्यांच्या पदरात अधिक सवलती पाडून घ्यायला ते पुढे सरसावले आहेत, आणि त्यात त्यांना मोठे यश मिळत आहे. नेहरूंनी उभ्या

केलेल्या सार्वजनिक उद्योगधंद्यांत लक्षावधी लोकांना नोकऱ्या मिळाल्या. त्यांचे उत्पादन काही नसले तरी त्यांना भरमसाठ पगार आणि भत्ते मिळताहेत. देशाचे काही झाले तरी नेहरूंमुळे त्यांना मिळालेली ही मिरासदारी अबाधित राहिली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे; आणि त्यापुढे सरकार मान तुकवीत आहे. 'इंडिया' तील मंडळींना नेहरू व्यवस्था म्हणजे मिळालेले घबाड आहे. देश जगो मरो, त्या घबाडाला कोठे धक्का लागणार नाही याची त्यांना खात्री आहे. त्या सगळ्या ऐतखाऊचे दैवतच नेहरू आहे. नेहरूंचे पुतळे खाली ओढून विनाकारणच एक नवा वाद तयार करण्याची त्यांना काही आवश्यकता नाही.

नेहरूंनी आखलेले धोरण पार अपयशी झाले. आता नवीन खुले आर्थिक धोरण स्वीकारले पाहिजे असा सगळीकडे गवगवा चालू आहे. खुली व्यवस्था कोठे कोठे येत आहे. नेहरूप्रणित समाजवादी नियोजनात, लायसेन्स-परमिटांच्या तटबंदीत गलेलठ्ठ झालेल्या कारखानदारांना खुल्या बाजारपेठेच्या झेंड्याखाली आणखी नवी मलई चारण्याडा कार्यक्रम अमलात येतो आहे. नेहरू 'इंडिया' वाल्यांचे पुढारी. मृत्युनंतर पावशतक होऊन गेले तरी ते 'इंडियाचे' भले करतच आहेत.

त्यांची दुष्मनी काय ती 'भारता'शी. शेतकरी, शेतीचे अर्थशास्त्र आणि शेतकऱ्यांच्या संघटना याबद्दल त्यांच्या मनात 'समाजवादी' तिरस्कार होता. शेतकऱ्यांची आंदोलने महात्माजींनी केली, वल्लभभाईंनी केली. नेहरू त्यावेळी स्पेनमधील यादवी, मेक्सिकोतील क्रांती आणि फॅसिझमचा उदय यांवरील आपली ब्रिटीश मते इंग्रजीत मांडीत होते. शेतकरी हे पोत्यात भरलेल्या बटाट्यांप्रमाणे आहेत हे मार्क्सचे मत त्यांनाही मान्य होते. कै. शंकरराव मोहिते यांनी महाराष्ट्रात शेतकरी संघटना काढली, हिरव्या गणवेशात तीसचाळीस हजार शेतकरी सोलापूरच्या मेळाव्यात उभे केले तेव्हा ती संघटना ताबडतोब बंद करण्याची सूचना पंडितजींनी शंकररावांना दिली. सहकारी शेती करण्याचा त्यांचा डाव चौधरी चरणसिंगांनी हाणून पाडला. गरीबी दूर करण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमीनधारणेवर नेहरूंची मर्यादा घातली. रफी अहमद किडवाईंनी सार्वजनिक वितरण व्यवस्था बंद करून टाकली होती ती नेहरूंनी पुन्हा चालू केली आणि शेतीमालाचे भाव पाडण्यासाठी कडेकोट व्यूहरचना केली. सक्तीची वसुली, जिल्हाबंदी, राज्यबंदी, साठेबंदी, निर्यातबंदी, प्रक्रियांवर बंदी, परदेशातून भरमसाठ आयात असल्या वेगवेगळ्या मार्गांनी त्यांनी शेतकऱ्यांची पोरे देशोधडीला लावली.

आज नेहरूवादी नियोजनाचा सर्वतोपरी पराभव झाला आहे असे मनोमन सर्वांना पटले आहे, पण कोणी तसे मोठ्याने बोलत नाहीत; तसे खुले आम बोलले तर मोठा गहजब होईल. नेहरू-अर्थकारणातील विकृती 'इंडिया' पुरती दूर करायची आहे, 'भारता'त नेहरूवादाचा नंगा नाच चालू राहिलाच पाहिजे असा 'इंडिया' वाल्यांचा आणि सत्ताधाऱ्यांचा हितसंबंध गुंतलेला आहे.

खुल्या बाजारपेठेचा उदोउदो भले चालू असो, शेतीच्या क्षेत्रात मात्र अजून नेहरूव्यवस्थाच थैमान घालत आहे. देशात परकीय चलनाचा मोठा तुटवडा आहे, पण कापूसनिर्यातीस बंदी आहे, कांदा निर्यातीवर बंधने आहेत. देश परकीयांच्या कर्जात बुडतो आहे तरी परदेशात साडेचारशे ते सहाशे रुपये प्रती क्विंटल भावाने गहू आणून तो देशातील बाजारात सव्वातीनशे रुपयांनी ओतण्याचे धोरण नव्या पंतप्रधानांनी जाहिर केले आहे. नेहरूवादाच्या या भूताने शेतकऱ्यांची आहे त्याहूनही धुळदाण होणार आहे. पण शेतकरी बिचारा सज्जन आहे. तो चिडत नाही. तो रागावत नाही. त्याला संताप येत नाही. पोरेबाळे उपाशी राहिली तरी तो शांत राहातो. बायकापोरे दुष्काळी कामावर खडी फोडायला जातात याचेही त्याला दुःख नाही. त्याला जोपर्यंत संताप येत नाही तोपर्यंत नेहरूंचे पुतळे पांढरी शुभ्र अचकन, राजबिंडे हास्य व छातीवरील गुलाब यांच्यासकट शेतकऱ्यांच्या छातीवर पाय देऊन उभे राहणारच आहेत.

■■

# संघटनेचा बिल्ला लावला म्हणून रोह्यो मजुरास कामावरून काढले आमदारांना परभणी जिल्ह्यात गाव बंदी

आडगांव ता. कंधार येथील रोजगार हमी योजनेवर दुष्काळात पोट भरण्यासाठी शेतकरी संघटनेचा एक कार्यकर्ता शेतकरी संघटनेचा बिल्ला लावून कामावर आला होता. या कामास रोहयो समितीचे सदस्य आ. जयसिंग गायकवाड यांनी भेट दिली असता बिल्लाधारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यास पाहून त्यांचे पित्त खळवले व त्यांनी ह्या रोहयो कामावर शेतकरी संघटनेच्या बिल्ला लाऊन का आलास असा सवाल केला असता कार्यकर्त्याने अत्यंत निर्भयपणे गायकवाड यांना निरुत्तर केले व तुम्हाला असे विचरण्याचा कोणी अधिकार दिला? असा उलट सवाल केल्याने त्याचा राग म्हणून सदर मजुरास कामावरून कमी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्याला दिले. ही मुजोरी आ. जयसिंग गायकवाड ह्यांना कुठल्या कायद्याने प्रदान केली आहे. आ. जयसिंग गायकवाड उद्दामपणे रोहयो कामावर भेटी देण्याचे नाटक करून भ्रष्टाचाराचे थैमान घालीत आहेत. दुष्काळात परभणीत येऊन सत्कार घेताना संघटनेने त्यांचा सत्काराच्यावेळी धिक्कार केला होता. त्याचा राग त्यांना रोहयो कामावरील बिल्ला धारी मजुरावर काढला आहे. आ. जयसिंगरावची मुजोरी व मस्तवालगीरी संघटना मोडून काढील. शासनाने आ. जयसिंगराव गायकवाड ह्यांना रोहयो समितीवरून त्वरीत काढून टाकावे अशी मागणी शेतकरी संघटनेचे ब. ल. तामसकर ह्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. आ. जयसिंग गायकवाड ह्यांच्या ह्या पत्रकाद्वारे आम्ही तीव्र निषेध व धिक्कार करतो. परभणी जिल्ह्यात आ. जयसिंग गायकवाड ह्यांना गांवबंदी करण्यात आली आहे, असे सर्वश्री ब. ल. तामसकर, माणिकराव पवार, गोविंद जोशी, दत्तराव नाईक, गुलाबराव राठी यांनी प्रसिद्धीपत्रक काढून जाहिर केले आहे.

# लक्ष्मीमुक्ती आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्या

**गेल ऑमवेट, कासेगाव (सांगली)**

शेतकरी संघटना आणि शेतकरी महिला आघाडी यांचा 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रम २ ऑक्टोबर १९९० पासून सुरू झाला आणि भारतातील स्त्री- चळवळ एक मोठे पाऊल टाकून आपल्या मार्गावर पुढे गेली. या आधी स्त्रियांना जमीन-मालमत्ता मिळवून देण्याचे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. भूमिहीनांना जमीन देतांना 'संयुक्त पट्टा (Joint Patta)' देण्याचे सरकारचे सहाव्या योजनेपासूनचे धोरण आहे. ते जरी कागदावरच राहिले असले तरी १९८३ साली बिहारमध्ये छात्र युवा संघर्ष वाहिनीने भूमिहीन स्त्रियांच्या नावावर जमिनी मिळविण्यासाठी प्रयत्न केले आणि दोनचार गावांत तसे करण्यात यशही मिळविले. परंतु 'लक्ष्मीमुक्ती' ही सामुदायिक पातळीवरील पहिलीच मोहीम आहे आणि हजारोलाखो गरीब, मध्यम शेतकरी पुरुष 'घरच्या लक्ष्मी' च्या नावावर जमीन देतील असे दोन वर्षांपूर्वी सांगितले असते तर त्यावर विश्वास बसला नसता, पण आज ते प्रत्यक्षात घडते आहे.

तसेच, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दहा गावात शंभर टक्के महिला ग्रामपंचायती निवडून आल्या हेही स्त्री चळवळीचे मोठे यश आहे आणि हेसुद्धा शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडी यांच्या कामामुळे शक्य झाले. या आधी 'स्त्रियांचा राजकीय हक्क' किंवा 'स्त्रियांना राखीव जागा' यांवर चर्चा होत होती, काही मोजक्या गावांत महिला पॅनेल उभे करण्याचे प्रयत्न झाले पण फारसे यश मिळाले नाही. चांदवड महिला अधिवेशनानंतर जेव्हा महाराष्ट्र पातळीवर समग्र महिला आघाडीचे आव्हान उभे राहिले तेव्हा ग्रामीण स्त्रियांच्या वाढलेल्या आकांक्षांना नवा आधार मिळाला आणि शेवटी पुन्हा काही गावांमध्ये स्त्रिया व पुरुषांनी नवीन प्रेरणा घेऊन महिला पॅनेल पुन्हा उभी केली आणि निवडून आणली. विटनेर, येणारा, मेटीखेडा, सालोड वगैरे गावांत ही क्रांतीकारक घटना घडली ती केवळ शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडी यांमुळेच घडली.

पण, जोतिबा फुले व बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा पुढे नेणाऱ्या या मोठ्या घटनांची प्रसिद्धी झाली नाही. १९९०-९१ हे फुले- आंबेडकर शताब्दी वर्ष होते. गेल्या दहापंधरा वर्षांत स्त्रियांच्या संघटना, मंच, समित्या लहानमोठ्या शहरांत व ग्रामीण भागांत खूप पसरल्या आहेत. स्त्रीपत्रकारांची संख्या अनेक पटींनी वाढली आहे. तरीही लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाला आणि महिला ग्रामपंचायतींना प्रसिद्धी नाही. मोठी कमालीची गोष्ट आहे! लांब असलेल्या विटनेर, येणोरा सारख्या गावाला स्त्री-पत्रकार किंवा कार्यकर्त्या जायला तयार नाहीत म्हणून चेतना गालाने मुंबईत पत्रकारपरिषद आयोजित केली होती. सरपंच व उपसरपंच महिला स्वखर्चाने मुंबईला गेल्या आणि तीन चार लेख आले. पुढे सामसूम. 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रम जोरात सुरू झाले पण वर्तमानपत्र गप्प. 'लक्ष्मीमुक्ती' ची सगळी गावे शहरांपासून दूर आहेत. तिथे शहरापासून पोहोचायला अर्धा-एक दिवस आणि कंटाळवाणा प्रवास करावा लागतो. कोण जाणार? एक स्त्रीपत्रकार पुण्यापर्यंत पोहोचल्या आणि शेतकरी महिला आघाडीशी पूर्वी संबंधित असलेल्या पण आता दूर राहिलेल्या तीन स्त्रीकार्यकर्त्यांची मुलाखात मागितली. त्या व्यक्तींनी ''अहो, आम्ही प्रत्यक्ष बघीतले नाही, तुम्ही जाऊन पाहा'' असे प्रामाणिकपणे सांगण्याऐवजी ''लक्ष्मीमुक्ती'' विषयी काहीही माहिती, अनुभव नसतांना काही मते मांडली, शंकाच शंका वाढल्या आणि त्यावरमात्र लेख छापून आले.

असे का होते? स्त्री-मुक्ती चळवळ व्यापक आहे पण विस्कळीत आहे. वेगवेगळ्या संघटना आहेत - काही राजकीय पक्षाच्या आहे. काही शहरी मध्यमवर्गीय स्त्रियांच्या 'स्वायत्त' म्हणविणाऱ्या, काही ग्रामीण भागात अपक्ष चळवळीशी संबंधित वगैरे. काही ठिकाणी स्त्रिया उत्स्फूर्तपणे किंवा पुरुष कार्यकर्त्यांच्या मदतीने हक्क मिळविण्यासाठी लढतात परंतु वस्तुस्थिती अशी आहे की सगळी प्रचारमाध्यमे शहरी उच्चमध्यमवर्गीय ( व त्यातल्या त्यात उच्च जातीच्या) स्त्री-कार्यकर्त्यांच्या हातात आहेत. 'स्वायत्त' शहरी स्त्री-कार्यकर्त्या जास्त शिकलेल्या, लिहिणाऱ्या, बोलू शकणाऱ्या आहेत. 'स्वायत्त' स्त्री-कार्यकर्त्यांना 'पुरुषांचे' वर्चस्व, बांधिलकी नको, शेतकरी संघटना नको तसेच राजकीय पक्षांच्या स्त्री-कार्यकर्त्यांनाही पक्षनिरपेक्ष शेतकरी संघटना नको. शहरातील उच्च मध्यमवर्गीय, उच्च जातींच्या स्त्री कार्यकर्त्यांना शेतकरी महिला आघाडीकडे बघण्याची इच्छा नाही. उलट, संधी मिळताच त्या आघडीबद्दल मुद्दाम गैरसमज पसरवतात; एकूणच शेतकरी संघटनेच्या विरुद्ध वातावरण मध्यम वर्गामध्ये आहे.

पण त्याच्या पलिकडे; देशाच्या कानाकोपऱ्यात ग्रामीण भागात अनेक शेतकरी-शेतमजूर स्त्रिया, आदिवासी, दलित, भटक्या जमातीच्या, मच्छिमार स्त्रिया आपल्या हक्कांसाठी लढत आहेत व दुसऱ्यांचा लढा पाहायला, त्यांचे

(पान ५ पहा)

---

*शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघडी यांच्या संयुक्त प्रयत्नाने महाराष्ट्रभरात सुरू असलेल्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाकडे इंडियन वृत्तपत्रांनी डोळेझाक केली असली तरी या कार्यक्रमाची माहिती देशाच्या कानाकोपऱ्यात स्त्रियांच्या हक्कासाठी धडपडणाऱ्या स्त्रीकार्यकर्त्यांपर्यंत पोहोचली. लक्ष्मीमुक्तीचे नेमके स्वरूप व परिणाम जवळून पाहाण्यास त्या सर्वजणी उत्सुकतेपोटी त्यांनी त्यांच्या परिचित अशा शेतकरी महिला आघाडीच्या कायकर्त्या गेल ऑमवेट व चेतना गाला यांच्याशी संपर्क करलन लक्ष्मीमुक्ती गावांचा दौरा आखण्याची विनंती केली. अनेक अडचणींना तोंड देत या दोघींनी २ ते ५ फेब्रुवारी १९९२ या दिवसांत हा दौरा आयोजित केला व पार पाडला. त्या दौऱ्यातील अनुभवांच्या निमित्ताने गेल ऑमवेट यांनी भारतातील स्त्रीचळवळीविषयीची आपली भावना 'लक्ष्मीमुक्ती आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्या' या लेखात व्यक्त केली आहे.*

*(पूर्वार्ध)*

# शेतकरी संघटक आजीव वर्गणीदार

## १ फेब्रुवारी ते २० जून १९९२

१२५) श्री. विष्णु गणपत धुळे, आंबा (जालना)
१४१) सौ. कमलबाई माणिकराव पवार, मुळी (परभणी)
१४२) श्री. शिवाजी नामदेव पाटील, देगाव (धुळे)
१४३) सौ. रखमाताई ज. दिगंबरपंत लहाने, खाबोरा (अमरावती)
१४४) सौ. उषाताई ज. ज्ञानेश्वरपंत उभाड, भिलोना (अमरावती)
१४५) सौ. आशाताई ज. सुभाषराव उभाड, भिलोना (अमरावती)
१४६) सौ. कासाबाई सीताराम सपकाळ, करतवाडी (बुलढाणा)
१४७) श्री. राजेंद्र पंडू मोरे, कवळी (लातूर)
१४८) श्री. रंगराव बळवंतराव पाटील, रामेगाव (लातूर)
१४९) सौ. सुंदर अंगदराव बंडगर, चांदोरी (लातूर)
१५०) श्री. कोटलिंग सिदलिंग बिराजदार, चिघळी (लातूर)
१५१) श्री. युवराव खराडे, अपचुंदा (लातूर)
१५२) शेती सेवाग्राम विकास सेवा संस्था म., वळीवडे (कोल्हापूर)
१५३) श्री. वसंतलाल शहा आणि कंपनी, महावीरनगर (सांगली)
१५४) राजुरा रिफॅक्टरीज लि., राजुरा (चंद्रपूर)
१५५) डॉ. नीळकंठ काळे, भिमनी (चंद्रपुर)
१५६) प्रा. अशोक शिवराम पाटील, जयहिंद कॉलनी, धुळे २.
१५७) श्री. सजन भिला पाटील, वडाळी (धुळे)
१५८) श्री. रमेश सुदाम पाटील, शिंदे (धुळे)
१५९) श्री. श्रीकांत तराळ, न्यु कॉंग्रेस नगर, अमरावती
१६०) अध्यक्ष, कामधेनू दूध उत्पा. व पूर. सह. सो. लि. मौजे डिग्रस (सांगली)
१६१) डॉ. अरविंद लक्ष्मण नाईक, हेर्ले (कोल्हापूर)
१६२) श्री. बाबासाहेब भाऊसाहेब निंबाळकर हेर्ले (कोल्हापूर)
१६३) श्री. सुधाकर देवाप्पा मणेरे, इचलकरंजी (कोल्हापूर)
१६४) शेतकरी महिला आघाडी, चिघळी (लातूर)
१६५) अध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समिती, दोंडाईचे (धुळे)
१६६) चेअरमन - दि. राहुरी सह. सा. का. लि., शिवाजीनगर (अहमदनगर)
१६७) डॉ. रत्ना श्याम अष्टेकर, दिंडोरी (नाशिक)
१६८) श्री. रवि जायखेडकर, कोथरुड (पुणे)
१६९) मे. संकल्प ट्रेडर्स, विंचूर (नाशिक)
१७०) श्री. दिगंबर काळू टिपरे, जायखेडा (नाशिक)
१७१) श्री. सोमनाथ केदू ब्राम्हणकार, जायखेडा (नाशिक)
१७२) श्री. वामन राघो पाटील, वळवाडे (नाशिक)
१७३) श्री. पांडुरंग झिपरु बोरसे, ब्राम्हणपाडे (नाशिक)
१७४) श्री. यशवंत लक्ष्मण देवरे, सटाणा (नाशिक)
१७५) श्री. श्रावण पूंजाराम शिरोळे, धांद्री (नाशिक)

(पान ४ वरून)

अनुभव, यशापयश जाणून घ्यायला उत्सुक आहेत; एकत्र यायला उत्सुक आहेत. लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम, महिला ग्रामपंचायती यासंबंधी थोडी माहिती मिळाली म्हणून त्या चळवळींतील खूप कार्यकर्त्या महाराष्ट्रात घडत असलेली स्त्री-हक्क क्रांती बघायला उत्सुक आहेत. आतापर्यंत, शहरी स्त्री-कार्यकर्त्यांनी आयोजित केलेल्या परिषदा, शिबिरे इत्यादि निमित्तांनी ग्रामीण भागात चाललेल्या वरील चळवळींतील कार्यकर्त्या शहरामध्ये एकत्र येत होत्या. आम्हाला असे वाटले की खेडेगावात जाऊन प्रत्यक्ष भेट व त्यातून अनुभवांची देवाणघेवाण होत राहिली तर शेतकरी-कष्टकरी स्त्रियांना एकमेकांकडून प्रोत्साहन मिळेल, एकमेकांचा आधार वाटेल.

म्हणून 'लक्ष्मीमुक्ती अभ्यासदौऱ्या' ची कल्पना आली. महाराष्ट्राबाहेरील काही स्त्री-कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन जीप किंवा इतर वाहन करून एखादे जोतिबा गाव, काही महिला ग्रामपंचायतींची गावे व काही 'लक्ष्मीमुक्ती' गावे यांना भेटी द्यायच्या अशी त्यामागील कल्पना.

(अपूर्ण)

# माजघर शेती प्रदर्शन

६ मे १९९२ च्या 'शेतकरी संघटक' च्या अंकात 'माजघर शेती प्रदर्शना' संबंधी सविस्तर निवेदन दिले होते. पण तयारीच्या दृष्टीने हे प्रदर्शन मेच्या शेवटी किंवा जूनमध्ये भरविण्यास वेळ अपुरा होईल हे लक्षात घेता हे प्रदर्शन ऑक्टोबर ९२ च्या सुमारास भरवावे असे शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीने सुचविले. तसे निवेदन २१ मे १९९२ च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले. दरम्यान, संपूर्ण महाराष्ट्रातून तीन महिला व एका पुरुष शेतकऱ्याने या प्रदर्शनासाठी आपली नावे नोंदविली. पुढे नावे येणे बंद झाले.

परंतु हे प्रदर्शन भरवायचे किंवा नाही हे या प्रदर्शनात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांच्या संख्येवरही अवलंबून राहील. त्यामुळे ही नाव नोंदणी सुरू राहाणे आवश्यक आहे.

तरी, ज्या शेतकरी मायबहिणींना व भावांना या प्रदर्शनात आपल्या माजघरात तयार झालेले पदार्थ, खाद्यपदार्थ इत्यादि प्रदर्शित करण्याची इच्छा आहे त्यांनी ३१ जुलै १९९२ पर्यंत आपली नावे, संबंधित पदार्थांच्या संपूर्ण वर्णनासह नाव, पदार्थातील घटक, वापरण्याची पद्धती, उत्पादन खर्च, टिकून राहण्याचा काळ, प्रदर्शनात प्रात्यक्षिक दाखविता येण्याची शक्यता इत्यादि -

**'माजघर शेती प्रदर्शन' कार्यालय**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण**
**ता. खेड जि. पुणे**
या पत्त्यावर नोंदवावीत.

'माजघर शेती प्रदर्शन' कार्यालय

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 22nd June, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
June 21, 1992

To

**PNCW 281**
Licence to post without prepayment **No. 87**

# सीताशेती

**प्रयोग सूत्र ४ :**

प्रयोग परिवारच्या पद्धतीने सीताशेतीचा प्रयोग करण्यासाठी आतापर्यंत तीन सूत्रे या सदरातून दिली गेली. यातील तिसरे सूत्र उपजाऊ माती तयार करण्याची माहिती देणारे होते. उपजाऊ माती म्हणजे प्रयोगासाठी वापरावयाच्या जमिनीवरील एक ते दीड इंचाच्या थरातील माती, तितक्याच आकारमानाचा पूर्ण कुजलेला कचरा आणि एकूण आकाराच्या सुमारे विसांश हिश्श्याने राख (काटक्याकुटक्यांची) यांचे मिश्रण.

प्रयोगपरिवारच्या अभ्यासानुसार पिकाच्या/झाडाच्या वाढीसाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे सूर्यप्रकाश. आपण ज्या पिकाच्या बाबतीत प्रयोग करावयाचा ठरविला असेल त्याच्या एका रोपाच्या विस्तारानुसार त्याला संपूर्णपणे सूर्यप्रकाश पोहोचेल व दोन रोपांच्यामध्ये जास्त जागा सुटल्याने सूर्यप्रकाश न वापरता फुकट जाणार नाही अशा तऱ्हेने जमिनीमध्ये ६ इंच × ६ इंच × ६ इंच खड्डे घ्यावेत किंवा ६ इंच खोलीचा तास मारावा (चर खणावा) आणि त्यामध्ये मागील सूत्राप्रमाणे तयार केलेली उपजाऊ माती भरावी. नंतर सर्व खड्डे/चर पाण्याने भिजवून त्याला वाफसा आला म्हणजे त्यात पेरणी करावी/रोप लावावे. सर्वसाधारणपणे वाटाणा, हरभरा, तूर इत्यादी कडधान्ये, भुईमूग, टोमॅटो, वांगी, भेंडी इत्यादींसाठी वरील आकारमानाचे खड्डे पुरेसे व्हावेत. झाडाच्या पाना-फांद्यांचा विस्तार मोठा असेल, म्हणजे झाड अधिक क्षेत्रफळातील सूर्यप्रकाशाचा वापर करणारे असेल तर त्याप्रमाणात खड्ड्याच्या आकारमानात वाढ करणे आवश्यक आहे. बी/रोप लावल्यापासून सर्व झाडांच्या वाढीचे सतत निरीक्षण करावे व त्याची टिपणे काढावीत. बीला अंकुर किती दिवसांनी फुटतो, पहिली दोनच पाने किती दिवस राहतात, त्यानंतर पाने कशी कशी येत राहतात, फांद्या कधी फुटू लागतात इत्यादी माहिती लिहून ठेवावी.

झाडांच्या दोन रांगामध्ये गवत इत्यादी उगवले तरी ते खुरपून काढू नये. त्याचा उपयोग आवश्यक त्यावेळी पिकाला पूरक अन्न म्हणून करता येईल.

प्रतिनिधी, कृ.अ.प्र.

# सीताशेती - सहभाग

शेतकरी संघटनेच्या शेगाव मेळाव्यात शेतकऱ्यांनी चतुरंग शेती करण्याचा निर्धार केला त्यातील सीताशेती हे पहिले अंग आहे. सीताशेती म्हणजे कुणीतरी कुठेतरी तयार केलेले तंत्रज्ञान आपल्या शेतीत वापरायला सुरुवात करणे असे नाही. तर, आधुनिक तंत्रज्ञानाच्या नावाखाली शेतीला आज जे परावलंबित्व प्राप्त झाले आहे त्यातून तिला मुक्त करण्यासाठी बाह्यसामुग्रीचा वापर कमीकमी करता येईल अशा तऱ्हेचे तंत्रज्ञान स्वतः शेतकऱ्यांनी, मुख्यतः स्त्रीशेतकऱ्यांनी एकदोन गुंठे क्षेत्रावर वेगवेगळे प्रयोग करून स्थानिक पातळीवर शोधून काढणे म्हणजे सीताशेती.

शेतकरी संघटकच्या मागील काही अंकात फक्त एका संस्थेच्या पद्धतीची प्रयोगसूत्रे दिली आहेत. ती सगळीकडेच यशस्वीपणे राबविता येतील असे नाही.

आता पावसाळा, उशिरा का होईना, सुरू होत आहे. आता तरी सीताशेतीच्या रूपाने गावोगाव छोट्या छोट्या शेती प्रयोगशाळा सुरू व्हाव्यात ही शेतकरी संघटनेची अपेक्षा आहे. किंबहुना, अशा प्रयोगशाळा गावोगाव सुरू होऊन त्यांचे संकलन झाल्याशिवाय जमिनीचा पोत खाऊन टाकणाऱ्या, रासायनिक खतांची जमिनीची भूक दिवसेंदिवस वाढविणाऱ्या, रासायनिक औषधांशिवाय पीक जगू न देणाऱ्या, भरमसाठ खर्च करूनही रासायनिक खते व औषधांनी प्रदूषित अन्नधान्य, फळफळावळ, भाज्या इत्यादि उत्पादन करणाऱ्या आजच्या घातक पद्धतींपासून शेतीची सुटका होणे अशक्य होणार आहे.

म्हणून 'सीताशेती' च्या अभियानात जास्तीत जास्त शेतकरी मायबहिणींनी सामील व्हावे अशी शेतकरी संघटनेची अपेक्षा आहे. आपण प्रयोग करा, त्याची माहिती कृषिअर्थ-प्रबोधिनीला आंबेठाण पत्त्यावर पाठवा. त्या माहितीचे संकलन करलन त्याला शेतकरी संघटकमध्ये प्रसिद्धी दिली जाईल व त्यावर चर्चा घडवून आणता येईल. किमान प्रत्येक माय-बहिणीला आपली परसबाग उभी करणे सहज शक्य आहे. त्याचा हिशोब मांडा म्हणजे झाली सीताशेतीची सुरुवात.

'सीताशेती' च्या अभियानात सामील होऊ इच्छिणाऱ्या शेतकरी मायबहिणींनी (आणि इच्छुक भावांनीही) आपली नावे व कशा तऱ्हेचे प्रयोग करणार त्याची प्राथमिक माहिती कृषि अर्थ प्रबोधिनीकडे नोंदवावी ही विनंती.

कृ. अ. प्र.

**शेतकरी संघटक**
वर्गणी पाठविण्याचा व पत्रव्यवहाराचा पत्ता
संपादक, शेतकरी संघटक,
अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१)
ता, खेड, जि. पुणे

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**